Downloaded From : http://cbseportal.com/

**Series JBB**

**SET-4**

कोड नं.
Code No. **8**

रोल नं.
Roll No.

परीक्षार्थी कोड को उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर अवश्य लिखें ।
Candidates must write the Code on the title page of the answer-book.

| | नोट | | NOTE |
|---|---|---|---|
| (I) | प्रश्न–पत्रिकेत **8** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या. | (I) | Please check that this question paper contains **8** printed pages. |
| (II) | प्रश्न–पत्रिकेच्या उजवीकडे छापलेला कोड नंबर उत्तर–पुस्तिकेच्या मुख–पृष्ठावर लिहा. | (II) | Code number given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate. |
| (III) | प्रश्न–पत्रिकेत **10** प्रश्न आहेत; तपासून घ्या. | (III) | Please check that this question paper contains **10** questions. |
| (IV) | कृपया उत्तर देण्यापूर्वी प्रश्नाचा क्रमांक उत्तर पुस्तिकेत लिहा. | (IV) | Please write down the serial number of the question in the answer-book before attempting it. |
| (V) | प्रश्न–पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्न–पत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्न–पत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करु नये. | (V) | 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the students will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period. |

# मराठी

# MARATHI

*वेळ : 3 तास* — *गुण : 80*

*निर्धारित समय : 3 घण्टे* — *अधिकतम अंक : 80*

*Time allowed : 3 hours* — *Maximum Marks : 80*



Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From :http://cbseportal.com/

## SECTION A

**1.** खालील उतारा वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. *10*

खरा आनंद, टिकाऊ आनंद हा अंतरंगातून येतो. बाह्य यश, वैभव मिळवण्यातही आनंद असतो, पण जर तुम्ही आत दुःखी असाल, उदास असाल, तर बाह्य यश तुम्हांला आनंद देऊ शकत नाही. जेव्हा भरपूर सुख, वैभव मिळवूनही माणसाला आनंद मिळत नाही. स्वतःबद्दल 'छान' वाटत नाही, समाधान होत नाही, तेव्हा माणूस एक चुकीचा निष्कर्ष काढतो. त्याला वाटतं, मला अजून काहीतरी मिळवायला हवयं. ते मिळालं, तरच मला आनंद वाटेल.

हीच गल्लत होते. अशा वेळी त्यानं बाहेर नव्हे, आत डोकवायला हवं. एवढं मिळवूनही मी आनंदात का नाहीय ? मला अशांत, अस्वस्थ का वाटतं आहे ? मला नेमकं काय हवं आहे ?

अशा वेळी उत्तर मिळू शकतं, 'मला विरंगुळा हवा आहे, मला बायको-मुलांत रमायला हवंय, मला मित्रांशी जिवाभावाचं बोलायला हवंय, मला लिहायला हवंय, मला लॅन्डस्केपस् करायला पाहिजे.' तुम्ही आनंदी नसता, त्यावेळी आणखी काही मिळवणं, अधिक पैसा कमावणं, अधिक नाव कमावणं हे त्यावरचं उत्तर नसतं. आपल्याला काय हवंय, ते शोधणं हेच उत्तर असतं आणि जे खरोखर हवं असतं, ते आपल्याजवळ असतंच. आनंद, प्रेम, शांती, समाधान-हे सगळं अंतरंगातच असतं. त्या अंतरीच्या आनंदाशी नातं जोडणं हीच आपली खरी गरज असते. हे नातं जोडणं अगदी सोपं असतं. बागेतल्या कुंड्याना पाणी घालता घालता किंवा लाडक्या कुत्र्याशी खेळता-खेळता हे 'कनेक्शन' होऊ शकतं.

दुःखाचं, उदासीचं कारण एकचं असतं, आंतरिक आनंदाशी तुटलेलं नातं. बाह्य परिस्थितीशी त्याचा काही संबंध नसतो. आर्थिक परिस्थितीशी तर नसतोच नसतो.

स्वतःला ओळखणं हे निरंतर आनंदासाठी गरजेचे असते. 'स्वरूप' जाणणं याचा आध्यात्मिक अर्थ काही असो; त्याचा साधा, सोपा अर्थ आहे स्वतःशी प्रामाणिक राहणं, स्वतःच्या सर्व आंतरिक, स्वाभाविक इच्छा जाणून त्या पुऱ्या करणं. म्हणजे पुन्हा आपण हवं ते मिळवण्याकडेच येतो.

सूचनेनुसार उत्तरे लिहा.

(अ) खालील प्रश्नांच्या उत्तरांचा अचूक पर्याय निवडून लिहा. (कोणतेही ***तीन*** )

(i) स्वतःबद्दल 'छान' वाटत नाही, समाधान होत नाही, तेव्हा माणूस एक चुकीचा __________ काढतो. (अर्थ/निष्कर्ष/अंदाज) *1*

(ii) अस्वस्थ माणसाला _________ हवा असतो. (निवांतपणा/विरंगुळा/एकटेपणा) *1*

(iii) 'स्वाभाविक' शब्दाचा विरुद्धार्थी शब्द खालीलपैकी कोणता आहे ? (स्वभावतः/अस्वाभाविक/अभाविक) *1*

(iv) स्वतःला ओळखणं हे ___________ आनंदासाठी गरजेचे असते. (खऱ्या/निरंतर/टिकाऊ) *1*


Downloaded From :http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From :http://cbseportal.com/

(आ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही ***तीन*** )

(i) खरा आनंद कोठे असतो ? *1*

(ii) वैभव असूनही समाधान होत नाही, त्यावेळी काय केले पाहिजे ? *1*

(iii) 'स्वरूप जाणणं' याचा सोपा अर्थ काय आहे ? *1*

(iv) उदासीचं कारण काय असते ? *1*

(इ) खालील प्रश्नांची उत्तरे 2 ते 3 वाक्यात लिहा.

(i) माणसाची गल्लत केव्हा व कोणती होते ? *2*

(ii) विरंगुळा मिळविण्यासाठी माणसाने कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत ? *2*

**2.** खालील उतारा वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. *10*

'कल्पना लढवणं' हा वाक्‌प्रचार खूपच बोलका आहे. कल्पनाशक्ती या शब्दातच कल्पनेचं सामर्थ्य दडलेलं आहे. जपानच्या प्रगतीचं यश 'काईझेन' या कल्पनेतच सामावेललं आहे. काईझेन म्हणजे अधिक चांगलं. कुठलीही गोष्ट सध्या केली जाते, त्यापेक्षा अधिक चांगली, अधिक जलद कशी करता येईल, या विचारातून कल्पना सुचतात. छोट्या छोट्या कल्पना परवडणाऱ्या असतात आणि त्यातूनच सतत सुधारणा होत राहते. प्रगती होत राहते. ती अंतिमतः नेत्रदीपक ठरते. कल्पनाशक्ती ही काही प्रज्ञावानांची, बुद्धिमत्तांची मिरासदारी नाही. डोळे व कान उघडे ठेवले आणि खुल्या दिलानं विचार केला, तर कुणालाही कल्पना सुचू शकतात.

खुल्या दिलानं विचार करावा उजव्या मेंदूनं ! आपला डावा मेंदू हा फक्त तार्किक-गणिती पद्धतीनं विचार करतो. भन्नाट कल्पना या सगळया मेंदूच्या उजव्या भागात शिजतात. डाव्या मेंदूला जरा गप्प बसवलं, तर उजवा मेंदू कार्यरत होतो. टेबलावर बसून डोकं चालत नाही, तेव्हा सरळ भटकायला जावं. चालताना, आंघोळ करताना, गाणी ऐकताना 'अचानक' उजव्या मेंदूला कल्पना फुटतात. म्हणूनच स्वतःला प्रश्न केला पाहिजे, ॲम आय थिंकिंग राइट ?

मेंदूच्या डाव्या भागातून असो की उजव्या, सुचलेल्या कल्पनांचं आपण स्वागत कसं करतो, त्या हाताळतो कशा, यावर यश अवलंबून असतं.

कल्पना सुचली की, ती वेडगळ वाटू शकते, अशक्य वाटू शकते पण तरीही ती वाया जाऊ देऊ नका. तिला खेळवा, पॉलिश करा, वापरून पहा.

'किर्लोस्कर' मासिकानं अनेक वाचकांना नवी जीवनशैली दिली, नव्या उद्योगासाठी प्रेरणा दिली. किर्लोस्कर मासिकातली परदेश वर्णनं वाचून एका न्हाव्याला परदेशी जाण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. विलायतेला जाण्याइतका पैसा एका गरीब न्हाव्याकडे कसा असणारं ? पण त्याला एक अफलातून 'कल्पना' सुचली. खटपटी-लटपटी करून त्यानं एका बोटीवर न्हाव्याची नोकरी मिळवली आणि त्या बोटीतून तो विलायतेची सफर करून आला.


Downloaded From :http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From :http://cbseportal.com/

सूचनेनुसार उत्तरे लिहा.

(अ) खालील प्रश्नांच्या उत्तराचा अचूक पर्याय निवडून लिहा. (कोणतेही ***तीन***)

(i) कल्पनाशक्ती ही काही प्रज्ञावानांची, बुद्धिमत्तांची __________ नाही. (मक्तेदारी/मिरासदारी/जवाबदारी) *1*

(ii) नेत्रदीपक या शब्दाचा अर्थ __________ . (डोळयांना सुखविणारे/डोळयांचे तेज वाढविणारे/मनाला थक्क करणारे) *1*

(iii) भन्नाट कल्पना आपल्या __________ मेंदूला सुचतात. (डाव्या/दोन्ही/उजव्या) *1*

(iv) किर्लोस्कर मासिकाने नवीन उद्योगांसाठी __________ दिली. (जीवनशैली/प्रेरणा/संधी) *1*

(आ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही ***तीन***)

(i) काईझेन म्हणजे काय ? *1*

(ii) कल्पना कोणाला सुचतात ? *1*

(iii) यश कशावर अवलंबून असते ? *1*

(iv) न्हाव्याला परदेशी जाण्याची तीव्र इच्छा का निर्माण झाली ? *1*

(इ) खालील प्रश्नांची उत्तरे 2/3 वाक्यांत लिहा.

(i) डाव्या व उजव्या मेंदूमध्ये कोणता फरक आहे ? *2*

(ii) न्हाव्याने आपली परदेशी सफर करण्याची इच्छा कशी पूर्ण केली ? *2*

## SECTION B

**3.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर दिलेल्या मुद्दयांच्या आधारे निबंध लिहा. *8*

(i) स्वच्छतेतून समृद्धीकडे ......

प्रचंड लोकसंख्या — अज्ञान, गरिबी — अस्वच्छता — रोगराई — स्वच्छतेचे महत्त्व नाही — स्वच्छता अभियान — सहकार्य — सशक्त, आरोग्य संपन्न भारत — विकासाचे मार्ग — समृद्धी.

(ii) स्वप्ने नसती तर ......

जगात प्रत्येकाला दुःख — आशावाद — दिवस पालटतील — स्वप्न पहाणे — त्यासाठी प्रयत्न — आजचे दुःख सहन करण्याची ताकद — त्यातून आनंद — ध्येयसिद्धी — अन्यथा दुःख, निराशा, नीरसता.

(iii) पुस्तकाचे मनोगत —

लेखकाकडून निर्मिती — छपाई — सर्वांनी उपयोग करावा — ज्ञान प्रसार — आज वापर नाही — मोबाईल — दूरदर्शन — मनोरंजनाला महत्त्व — पुस्तकाचा नीट वापर नाही — दुर्लक्षित — दुःख.


Downloaded From :http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From : http://cbseportal.com/

**4.** (अ) खालील मुद्द्यांच्या आधारे गोष्ट लिहा व गोष्टीला शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. *7*

मुद्दे : जंगलचा राजा सिंह — गर्विष्ठ — इतर प्राणी घाबरत — सिंह रात्री ओरडून आवाज करू लागला — गवतावर झोपलेल्या गांधीलमाशीची झोपमोड — ती चिडली — सिंहाला युद्धाचे आव्हान — त्याच्या नाकात गेली — सिंह असहाय्य — सिंहाचे गर्वहरण.

**किंवा**

खालील विषयावर बातमी लेखन करा.

आंतरशालेय क्रीडास्पर्धेत तुमच्या शाळेला बास्केटबॉल मध्ये प्रथम क्रमांक मिळाल्याची बातमी तयार करा.

(आ) खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर पत्र लिहा. *5*

घराच्या आसपासच्या रस्त्यावरील कचरा साफ न केल्याबद्दलची तक्रार करणारे पत्र महानगरपालिका आरोग्यविभागाला लिहा.

**किंवा**

शाळेतील क्रीडाविभागासाठी क्रीडासाहित्याची मागणी करणारे पत्र दुकानदाराला लिहा.

## SECTION C

**5.** (अ) सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही ***चार***) *4*

(i) तो आंबा पिकलेला आहे. (सर्वनाम ओळखा)

(ii) लहान मुले झोपली आहेत. (विशेषण ओळखा)

(iii) श्वेताने काम पूर्ण केले. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(iv) झाडावर खूप पक्षी आहेत. (शब्दयोगी अव्यय ओळखा)

(v) उमेश घरी होता म्हणून त्याची भेट झाली. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(vi) पक्षी एका क्षणात उडाला. (क्रियाविशेषण अव्यय ओळखा)

(आ) सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही ***तीन***) *3*

(i) विनय गावी गेला. (भविष्यकाळ करा)

(ii) गीताने काम केले असेल. (काळ ओळखा)

(iii) सविताने पुस्तक आणले. (वर्तमानकाळ करा)

(iv) तिला फुले आवडतात. (भूतकाळ करा)

(v) पावसात खेळताना मजा येते. (काळ ओळखा)



Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From : http://cbseportal.com/

(इ) पुढील वाक्ये कंसातील सूचनेनुसार लिहा. (कोणतेही ***तीन***) *3*

(i) पुराचे पाणी त्याच्या घरात शिरले. (उद्‌गारवाचक वाक्य करा)

(ii) नागरिकांनी रस्त्यावर घाण करू नये. (आज्ञार्थी वाक्य करा)

(iii) मी दिलेले पुस्तक तुला आवडले नाही. (प्रश्नार्थक वाक्य करा)

(iv) अस्वच्छ कपडे कधी घालू नयेत. (होकारात्मक वाक्य करा)

(v) तुमच्या मदतीमुळे आमची सोय झाली. (नकारात्मक वाक्य करा)

(ई) सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) सुखदा घरी गेली. (प्रयोग ओळखा)

(ii) शुभम्‌ने नवीन घर बांधले. (प्रयोग ओळखा)

(iii) सैन्याने शत्रूला घेरले. (प्रयोग ओळखा)

(iv) गाडी खूप सावकाश जाते. (प्रयोग ओळखा)

(उ) लिंग बदला. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) मांजर

(ii) लोटा

(iii) जनक

(iv) सोनार

(ऊ) वचन बदला. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) वही

(ii) माशी

(iii) पक्षी

(iv) पोहा

(ए) समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) दासी

(ii) भूक

(iii) माता

(iv) कान

(ऐ) विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) सुशिक्षित

(ii) मान

(iii) आदर

(iv) जलद



Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From : http://cbseportal.com/

## SECTION D

**6.** (अ) योग्य पर्याय शोधून उत्तरे लिहा. (कोणतेही ***तीन*** ) *3*

(i) आमच्या हायस्कूलमध्ये दर शनिवारी ________ घेण्यात येत असे.
(वक्तृत्व स्पर्धा, चाचणी परीक्षा, व्यायाम)

(ii) साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च मानाचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार _________ यांच्या 'ययाति' या कादंबरीला मिळाला.
(ग.दि. माडगूळकर, पु.ल. देशपांडे, वि.स. खांडेकर)

(iii) लिंबाचा रस तर मला _________ वाटू लागला.
(औषधासारखा, सरबतासारखा, अमृतासारखा)

(iv) शालीमुळे शालीनता येते की जाते ? या प्रश्नाचे माझे उत्तर ________ असेच आहे. (येते, जाते, वाढते)

(v) नाही रे बाळा. तू _________ नागरिक आहेस. शेकडो माणसांचा जीव वाचवलास. (आदर्श, खरा, उत्तम)

(आ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही ***तीन*** ) *3*

(i) डॉ. माशेलकरांनी 'माझे संस्कार केंद्र' कोणास म्हटले आहे ?

(ii) सोकाजी त्रिलोकेकरने पंतांना कोणती गोष्ट सोडण्याचा सल्ला दिला ?

(iii) लेखकाने म्हाताऱ्याला दिलेल्या शालींचे त्याने काय केले ?

(iv) निरंजनचा कोणत्या विषयाचा पेपर चुकला होता ?

(v) मराठी दिन 27 फेब्रुवारीला का साजरा करतात ?

(vi) अब्दुल तपोवनामध्ये कोणत्या दिवशी जात असे ?

**7.** 30 ते 40 शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही ***दोन*** ) *4*

(i) सुमितने तयार केलेल्या नवीन ॲपची माहिती थोडक्यात लिहा.

(ii) कादंबरीने करून दिलेला स्वतःचा परिचय तुमच्या शब्दांत लिहा.

(iii) दुसऱ्या दिवशी पंतांचा व्रतभंग कसा झाला ?

(iv) आपल्याजवळच्या शाली योग्य व्यक्तींना दिल्याचे लेखकाला समाधान मिळाले, हे पाठातून कसे व्यक्त झाले आहे ?

(v) घरच्या लोकांची नाराजी पत्करूनही अब्दुलचा तपोवनामध्ये जाण्याचा दृष्टिकोन तुमच्या शब्दांत लिहा.

**8.** (अ) योग्य पर्याय निवडून वाक्ये परत लिहा. (कोणतेही ***दोन*** ) *2*

(i) अशा असंख्य ज्योतींची तुझ्यामागून राखण;
_________ असे तुला एकच औक्षण. (देशवासियांचे, दीनदुबळयांचे, आम्हां साऱ्यांचे)


Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From : http://cbseportal.com/

(ii) भाकरीचा ________ शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली (तुकडा, चंद्र, घास)

(iii) _________ पडे बाळू । माते धावे कनवाळू ।।
(पाण्यामाजि, खेळताना, अग्निमाजि)

(iv) नव्या पिढीचे, नव्या _______ स्वप्न करू साकार ।। (मनूचे, युगाचे, जगाचे)

(आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ***चार***) 4

(i) नारायण सुर्वे कशाचा हिशोब करतात ?

(ii) इंदिरा संतांना डोळे भरून काय पहावेसे वाटते ?

(iii) निर्मळ करण्याच्या बाबतीत पाण्यापेक्षा योगी का श्रेष्ठ आहे ?

(iv) फुला मुलांतून कोण हसते ?

(v) संत नामदेवांनी चातक कोणास म्हटले आहे ?

(vi) किशोर पाठक यांना कोणता जयजयकार करावयाचा आहे ?

**9.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** काव्यपंक्तीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा. 2

(i) घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार ।।

(ii) भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली

(iii) भुकेलें वत्सरावे । धेनु डुंबरत धावे ।।

**10.** योग्य पर्याय निवडून वाक्ये परत लिहा. 2

(अ) स्काय इज द लिमिट, असे _________ म्हणाले.

(i) होमी भाभा

(ii) डॉ. अनिल काकोडकर

(iii) फोरमन

(आ) 'दार' हा शब्द __________ आहे.

(i) फारसी

(ii) मराठी

(iii) अरबी

**किंवा**

खालील प्रश्नांची ***एका*** वाक्यात उत्तरे लिहा. 2

(i) व्युत्पत्ती कोश कशास म्हणतात ?

(ii) 'बार्क' म्हणजे काय ?



Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE